Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-9(A)| September 2025

Original Article

# कोविड विधवा महिलांच्या समस्या - एक अभ्यास

**डॉ.अविनाश गोरे[1], रेणुका कड [2]**
[1]संशोधन मार्गदर्शक, महात्मा गांधी मिशन विद्यापीठ छत्रपती संभाजी नगर
[2]संशोधन संशोधक, महात्मा गांधी मिशन विद्यापीठ छत्रपती संभाजी नगर
**Email- rkpatil3@gmail.com**

**Manuscript ID**:
JRD -2025-170914
ISSN: 2230-9578
Volume 17
Issue 9(A)
Pp.69-73
September 2025
**Submitted:**23 Aug. 2025
**Revised:** 4 Sept. 2025
**Accepted:** 21 Sept. 2025
**Published:** 30 Sept. 2025

***सारांश***

*जागतिक संकट ठरलेल्या कोविड महामारी ने समाजातील प्रत्येक घटकावर प्रतिकूल परिणाम केले. हे परिणाम दीर्घकालीन ठरले या महामारीच्या संकटामुळे समाजातील प्रत्येक स्तरावरील व्यक्तीची आर्थिक आणि सामाजिक स्थिती पूर्णतः ढवळून निघाली. या महामारीचे सर्वाधिक परिणाम महिला आणि बालकावर झाले. covid महामारीच्या काळात विधवा झालेल्या महिलांच्या आर्थिक आणि सामाजिक स्थितीवर मोठ्या प्रमाणावर नकारात्मक आणि प्रतिकूल परिणाम झाल्यामुळे त्यांचे प्रचंड हाल झाले. विधवा महिलांना सुरक्षितपणे जगण्यासाठी अनेक प्रकारच्या समस्यांना आणि आव्हानांना सामोरे जावे लागले याचा प्रत्यय कोविड महामारीच्या काळात पुन्हा एकदा आला. अनेक महिला अकाली विधवा झाल्या काहींच्या कुटुंबातील एकमेव कमावत्या व्यक्तीचा कोविड मृत्यू झाल्यामुळे त्यांना मोठ्या प्रमाणावर आर्थिक समस्यांना सामोरे जावे लागले. प्रस्तुत अभ्यासाच्या माध्यमातून कोविड काळात विधवा झालेल्या महिलांच्या आर्थिक सामाजिक समस्यावर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न केला आहे.*

***संदर्भ शब्द -*** *कोविड महामारी, विधवा महिला, आर्थिक/ सामाजिक समस्या*

## प्रस्तावना

भारतीय समाज व्यवस्था ही काही प्रमाणात धार्मिक आणि सांस्कृतिक परंपरांशी बांधली गेली असल्यामुळे त्याचे बरेच वाईट परिणाम समाजातील सर्वसामान्य लोकांवर होतच आहे. त्याचा सर्वाधिक फटका हा भारतीय महिलांना बसतो. विशेषतः विधवा महिलांना. आजही विधवा महिला प्रति समाजाचा दृष्टिकोन हा दूषितच आहे. शुभ अशुभाच्या कल्पना अंधश्रद्धा यामुळे भारतीय पुरुष प्रधान समाज व्यवस्थेत विधवा महिलांना गौण स्थान दिले आहे त्यामुळे विधवा महिलांना आर्थिक सामाजिक स्तरावर अनेक प्रकारच्या समस्यांना आणि आव्हानांना सामोरे जावे लागते हे वास्तव आजही दिसून येते. भारतीय विधवा महिलांना त्यांचे मूलभूत हक्क मिळवण्यासाठी, अधिकारांसाठी आणि समाजात सन्मानाने जगता यावे यासाठी मोठा संघर्ष करावा लागतो हे वास्तव कोविड महामारीच्या काळात पुन्हा एकदा दिसून आले. महामारीच्या काळात कुटुंबातील एकमेव कमावत्या व्यक्तीला ( पती) ज्या महिलांनी गमावले आहे, त्यांच्या आयुष्यात अमुलाग्र असे बदल झाले. परंतु, हे बदल नकारात्मक आणि सुखाने आनंदाने जगण्याच्या दृष्टीने प्रतिकूल ठरल्यामुळे त्यांना तीव्र दुःख मानसिक धक्का आणि अनेक प्रकारच्या आर्थिक सामाजिक आणि कौटुंबिक समस्यांचा भार सहन करावा लागला.

*Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)*
*This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.*

Quick Response Code:
Website: https://jrdrvb.org/
DOI: 10.5281/zenodo.17510380
OPEN ACCESS

**Address for correspondence:**
*डॉ.अविनाश गोरे, संशोधन मार्गदर्शक,महात्मा गांधी विद्यापीठछत्रपती संभाजी नगर*

**How to cite this article:**
*गोरे, . अविनाश ., & कड, . रेणुका . (2025). कोविड विधवा महिलांच्या समस्या - एक अभ्यास. Journal of Research and Development, 17(9(A)), 69–73. https://doi.org/10.5281/zenodo.17510380*

आजवर प्रकाशित झालेल्या साहित्याद्वारे विधवा महिला संदर्भात जे दिसून आली त्यात, आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या विधवा, शहीद सैनिकांच्या विधवा किंवा एडसने मृत्यू झालेल्यांच्या विधवा इत्यादीवर चर्चा करण्यात आली. आज या प्रकारामध्ये कोविड महामारीच्या काळात विधवा झालेल्या महिलांची भर पडली आहे. या महिलांच्या आर्थिक सामाजिक समस्या नेमक्या काय आहेत याचा मागोवा प्रस्तुत साहित्याच्या माध्यमातून घेतला आहे.

**संदर्भ साहित्याचा आढावा**

1. स्मिता पानसरे (2021) - यांनी कोविड काळात विधवा झालेल्या महिलांच्या समस्येवर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न केला आहे. कोविड काळात विधवा महिलांना कोणत्या प्रकारच्या आर्थिक सामाजिक समस्यांना सामोरे जावे लागले त्याचे दुरगामी परिणाम त्यांच्या जीवनावर काय होत आहेत याबाबत लेखिकेने अभ्यासपूर्ण चर्चा केली आहे. अशा विधवा महिलांनाच नव्हे तर त्यांच्या मुलावरही काय काय परिणाम झाले आहेत यावरही त्यांनी समग्र चर्चा केली आहे.
2. बी. के. हरसुळे (2020) - यांनी कोविड विधवांच्या पुनर्वसन कार्यात समाजसेवकांची भूमिका काय होती याबाबत चर्चा केली आहे. लेखकाच्या निदर्शनास असे आले की, पतीच्या मृत्यू पश्चात काही विधवा महिलांनी आपल्या आर्थिक गरजा पूर्ण करण्यासाठी अनैतिक मार्ग अवलंबले होते आणि त्यातूनच काही नव्या समस्या पुन्हा निर्माण झाल्या. ताळेबंदीच्या काळात अशा महिलांना आपल्या मुलांच्या भवितव्याची आणि आर्थिक परिस्थिती बाबत अधिक चिंता जाणवू लागली.
3. हर्षला सूर्यवंशी (2022) - यांनी कोविड महामारीच्या काळात अकाली वैधव्य प्राप्त झालेल्या तरुण विधवा महिलांच्या आर्थिक, सामाजिक आणि आरोग्य संबंधित परिस्थितीचा आढावा घेतला आहे. कोविड महामारीच्या काळात विधवा झालेल्या बहुसंख्य महिलांना कौटुंबिक गरजा भागवण्यासाठी नोकरी अथवा छोटा-मोठा व्यवसाय करावा लागला त्याचबरोबर कुटुंबातील ज्येष्ठ व्यक्तीमुळे यांचा सांभाळ करणे अशी दुहेरी जबाबदारी पार पाडावी लागली या बाबीकडे लेखिकेने विशेष लक्ष वेधले.
4. प्रियंका तुपे (2021) - यांनी कोविड काळात विधवा झालेल्या काही विधवा महिलांच्या आर्थिक सामाजिक समस्यावर व्यष्टी अध्ययनाच्या माध्यमातून प्रकाश टाकण्याचा प्रयत्न केला आहे. सासर माहेरच्या कुटुंबांनी बेदखल केल्यामुळे काही महिलांना पोट भरण्यासाठी त्यांच्या परिसरातील मंदिरात रोज दिल्या जाणाऱ्या प्रसादावर अवलंबून राहावे लागले ही बाब लेखिकेने विधवा महिलांच्या आर्थिक सामाजिक समस्यावर चर्चा करताना निदर्शनास आणून दिली.

**अभ्यासाची पद्धत**

प्रस्तुत अभ्यास हा वर्णनात्मक असून केवळ दुय्यम माहिती अथवा तथ्यावर आधारित आहे. अभ्यासासाठी आवश्यक असणारी माहिती विविध इंग्रजी, मराठी जर्नल्स मध्ये प्रकाशित झालेल्या अभ्यासपूर्ण लेख, काही महत्त्वाची पुस्तके, वर्तमानपत्रात प्रकाशित झालेल्या लेखाद्वारे संकलित केली आहे.

**अभ्यासाची उद्दिष्टे**

1. कोविड महामारीच्या काळात विधवा झालेल्या महिलांच्या आर्थिक, सामाजिक समस्यावर प्रकाश टाकणे.
2. कोविड महामारीच्या काळात विधवा झालेल्या महिलांच्या पुनर्वचनासाठी उपाययोजना सुचवणे.

**कोविड महामारीच्या काळात विधवा झालेल्या महिलांच्या आर्थिक सामाजिक समस्या**

एका अभ्यास पाहणी वरून असे निर्देशनास आले की, देशात अंदाजे साडेचार लाख लोकांचा मृत्यू झाला तर महाराष्ट्रात अंदाज आहे दीड लाख लोकांचा मृत्यू कोविड महामारी मुळे झाला. यात पुरुषांच्या मृत्यूचे प्रमाण जवळपास 60% इतके होते. महाराष्ट्रात किमान 70000 महिला कोविड काळात विधवा झाल्या. जवळपास 20 ते 30 हजार विधवा महिलांच्या कुटुंबाच्या पुनर्वसनाची गंभीर समस्या निर्माण झाली. नागरी आणि ग्रामीण भागातील विधवा महिलांच्या जीवनपद्धतीत अंतर आहे. या विधवा महिलांमध्ये असलेले सुशिक्षिततेचे प्रमाण, आर्थिक सामर्थ्य, अंगभूत असलेले कौशल्य इत्यादी घटकांवर त्यांचे आजची जीवनशैली अवलंबून आहे. कोविड महामारीच्या दुसऱ्या लाटेत तुलनेने कमी वय असलेल्या पुरुष व्यक्तींचे होते. त्यामुळे तरुण विधवांची संख्या या लाटेत वाढलेली दिसते. या विधवा महिलांची आर्थिक स्थिती पूर्णपणे ढासळलेली आहे कुटुंबातील एकमेव कमावत्या व्यक्तीचे निधन होणे, कोणतेही व्यवसाय कौशल्य नाही, घर कामाव्यतिरिक्त इतर कोणत्याच कामाचा अर्थार्जनाच्या दृष्टीने अनुभव नाही, अशा परिस्थितीत मुलांचे

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-9(A)| September 2025

संगोपन, त्यांचे शिक्षण, कुटुंबाचा चरितार्थ, कर्ज असेल तर त्याची परतफेड अशा प्रतिकूल परिस्थितीत बहुसंख्य कोविड विधवा जगत आहेत. त्यातच, वाढलेली आर्थिक जबाबदारी, समाज आणि माहेर सासरच्या कुटुंबाकडून मिळालेली वाईट वागणूक उपेक्षा अशा समाजाचाही सामना करावा लागत आहे. या समस्यांशी सामना करताना काही विधवा महिलांचे मानसिक आरोग्य सुद्धा काहीसे बिघडले. पतीच्या अकाली मूर्तीमुळे झालेल्या सामाजिक आणि आर्थिक नुकसानीची भावना प्रबल झाल्यामुळे त्यांना अनेक प्रकारच्या भावनिक आणि इतर समस्यांना बळी पडावे लागले.

कोविड विधवा महिलांच्या बाबतीत जाणवलेली प्रमुख समस्या म्हणजे पुरुष केंद्रित समाज व्यवस्थेत स्वतःच्या अस्तित्वासाठी, जगण्यासाठी द्यावा लागणारा लढा. हा लढा लढतानाच शारीरिक- मानसिक आरोग्याची होणारी हेळसांड, मुलांच्या संगोपनाची आणि त्यांच्या शिक्षणासंबंधी समस्या, संपत्तीवरील नाकारलेला हक्क आणि एक विधवा म्हणून कुटुंब व्यवस्था, समाज व्यवस्थेतच मिळालेले गौण स्थान आणि मुले, कुटुंब असूनही निराधार पणे आयुष्य जगायला भाग पडणे इत्यादी बाबींमुळे अशा महिलांचे आयुष्य कोविड महामारीच्या काळात अधिकच यातनामय ठरले. ज्या महिलांच्या पतींनी कोविड पूर्वकाळात कोणत्या ना कोणत्या कारणासाठी कर्ज काढली होती त्यांच्या वसुलीसाठी बँका, पतसंस्था यांनी त्रास देण्यास सुरुवात केली. वसुली पथकाकडून धमक्यात दिल्या जात त्यामुळे या महिला सतत भीती आणि दडपणाखाली वावरत. आर्थिक उत्पन्नाचा दुसरा स्त्रोत नसल्यामुळे चरित अर्थ कसा चालवायचा याचेही चिंता त्यांना होतीच. त्यातच, पतीच्या मृत्युपत्रात काही विधवा महिलांच्या त्यांच्या पतीच्या संपत्तीवरील हक्क सासरच्या कुटुंबीयांकडून नाकारला गेला; किंवा त्यांना नकळत संपत्ती पासून हेतूपूर्वक कुटुंबीयांकडून हेतूपूर्वक दूर ठेवले, बेदखल केले. कित्येक विधवा महिलांना, घराबाहेर काढले या सर्वांचा दूरगामी परिणाम त्यांच्या आर्थिक स्थितीवर झाला. पतीच्या कोविड वरील उपचारासाठी कित्येक महिलांनी विविध स्त्रोतांद्वारे कर्ज सुद्धा काढले होते. पतीच्या मृत्युपच्यात या महिला कर्जबाजारी झाल्यामुळे त्यांना आर्थिक समस्यांचा सामना करावा लागत आहे. तरुण विधवा महिलांना तर आर्थिक समस्या बरोबरच सामाजिक समस्यांचा सुद्धा मोठ्या प्रमाणावर सामना करावा लागत आहे.

पुरुषांच्या वाईट नजरा, कौटुंबिक अत्याचार, विधवा म्हणून समाजात होणारी मानहानी अशा सर्व प्रकारच्या समस्यांना कोविड काळात अनेक महिलांना सामोरे जावे लागले; आणि आजही या समस्या संपलेल्या नाहीत. आजही अशा विधवा महिलांना त्यांच्या मूलभूत हक्कांसाठी, अधिकारांसाठी आणि समाजात सन्मानाने जगण्यासाठी संघर्ष करावा लागत आहे. समाजातील कुटुंबातील पुरुषांकडून अनेक तरुण विधवा महिलांना शारीरिक अत्याचाराला बळी पडावे लागले. कोविड काळात त्यांच्या प्रति सासरच्या कुटुंबातील लोकांचा दृष्टिकोनही कलुषित झाला. कोविड काळात आर्थिक कौटुंबिक आणि मानसिक आधार नसणे ही एक फार मोठी समस्या विधवांपुढे निर्माण झाली. त्यामुळे बहुतांशी विधवा महिलांनी आपली रोजी रोटी स्वतःच मिळवायला सुरुवात केली. विधवा महिलांच्या सासर किंवा माहेरच्या कुटुंबातील कोणत्याही व्यक्तीने कसल्याही प्रकारच्या मदतीचा हात दिला नाही, उलट त्यांचा हक्क हिरावून घेतला गेला. कोविड काळात अशा घटना मोठ्या प्रमाणावर दिसून आल्या.

**कोविड महामारीच्या काळात विधवा झालेल्या महिलांच्या पुनर्वसनासाठी उपाय योजना**

कोविड विधवांच्या आर्थिक सामाजिक समस्या सर्वच स्तरावरून सोडवण्यासाठी प्रयत्न होणे गरजेचे आहे. अशा विधवा महिलांच्या समस्या त्यांचे आर्थिक प्रश्न सोडवताना ज्या अडचणी निर्माण होत आहेत त्या अडचणी निर्माण होण्यामागची कारणे सर्वप्रथम शोधून काढली पाहिजेत. शासकीय स्तरावरून कोविड काळात विधवा झालेल्या महिलांसाठी अनेक योजना अंमलात आणल्या आहेत. परंतु, या योजनांमधील उनिवा, भ्रष्टाचार या बाबींमुळे त्यांची अंमलबजावणी परिणामकारकपणे होताना दिसत नाही. त्यामुळे बहुसंख्य विधवा महिला या योजनांचा लाभ घेण्यापासून वंचित राहिल्या आहेत. या समस्या दूर करण्यासाठी काही उपाययोजना सुचवलेल्या आहेत त्या पुढील प्रमाणे,

1. ग्रामीण भागातील कोविड विधवा महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणासाठी बचत गट हा अत्यंत उपयुक्त असा उपक्रम आहे. या उपक्रमाच्या माध्यमातून अशा महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणासाठी शासनाने स्वयंसेवी संस्थांची मदत घेणे आवश्यक आहे.
2. कोविड महामारीच्या काळात विधवा झालेल्या महिलांना केवळ शासकीय आर्थिक मदत देऊन पुरेसे होणार नाही, तर त्यांच्या सासर माहेरच्या कुटुंबाच्या संपत्तीतील जमिनीतील योग्य वाटा मिळणे आवश्यक आहे. त्याबाबत कायद्यात सुधारणा करणे आवश्यक आहे.

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-9(A)| September 2025

3. प्रधानमंत्री जनधन योजना, इंदिरा गांधी राष्ट्रीय विधवा निवृत्ती योजना, संजय गांधी निराधार अनुदान योजना अधिक प्रभावीपणे अमलात आणण्याच्या दृष्टीने सर्वच स्तरावरून प्रयत्न होणे आवश्यक आहे.
4. कुटुंबातून बहिष्कृत केलेल्या किंवा सासर माहेरच्या कुटुंबाने जबाबदारी नाकारलेल्या विधवा महिलांसाठी व सतीग्रहाचे योजना व्यापक प्रमाणात राबवणे आवश्यक आहे.
5. वारसा हक्कापासून वंचित ठेवणे ही कोविड विधवांची फार मोठी समस्या आहे. सासरचे लोक अशा महिलांना त्यांचा वारसा हक्क देत नाहीत, उलट त्यांना घराबाहेर काढण्याचा प्रयत्न केला जातो. अशा विधवा महिलांचे नाव त्यांच्या दिवंगत पतीच्या संपत्तीवर लागावे यासाठी शासकीय स्तरावर मोहीम अमलात आणणे गरजेचे आहे.
6. योग रोजगार हेच विधवा महिलांच्या पुनर्वसनाचे महत्त्वाचे स्त्रोत आहे. म्हणून अशा महिलांना शासकीय योजनांमध्ये प्राधान्य क्रम देणे आवश्यक आहे. कृषी विभाग, आदिवासी कल्याण विभाग आणि समाज कल्याणच्या विविध योजनांच्या माध्यमातून विधवा महिलांना रोजगाराची संधी प्राधान्य क्रमाने दिली तरीही अशा महिलांचे आर्थिक सक्षमीकरण मोठ्या प्रमाणात होऊ शकते.
7. उमेद महाराष्ट्र राज्य महिला आर्थिक विकास महामंडळ ( मावीम) यासारख्या संस्था राज्यातील ग्रामीण भागात रोजगार निर्मितीसाठी परिणामकारकपणे कार्य करीत आहेत. या संस्थांच्या माध्यमातून कोविड काळात विधवा झालेल्या महिलांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देता येऊ शकतात.
8. कोविड विधवा महिलांसाठी तामिळनाडू सरकारने स्वतंत्र महामंडळ स्थापन केले आहे. तामिळनाडू सरकारकडून स्वयंरोजगार असणाऱ्या विधवा महिलांना कर्जात 50 टक्के सबसिडी देते. तर केरळ सरकारकडून अशा महिलांना व्यवसाय सुरू करण्यासाठी 30 हजार रुपयांची आर्थिक मदत देते. उत्तराखंड सरकार 50 हजारांची आर्थिक मदत देते तर छत्तीसगड सरकार केवळ तीन टक्के व्याजदराने कर्ज उपलब्ध करून देते. या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र शासनाकडूनही covid विधवा महिलांसाठी बिनव्याजी किंवा नाममात्र व्याज कर्ज योजना अमलात आणली गेली तर मोठ्या प्रमाणावर अशा महिलांना आपले स्वातंत्र्य व्यवसाय उभे करता येतील. अशा महिलांसाठी स्वतंत्रपणे कर्ज योजनेची अंमलबजावणी करणे आवश्यक आहे.
9. आर्थिक कौटुंबिक समस्यांच्या चिंतेमुळे विधवा महिलांच्या शारीरिक व मानसिक आरोग्यावरही परिणाम होत आहेत. काही महिला मानसिक आजारांच्या बळी ठरल्या आहेत. म्हणून स्वयंसेवी संस्थांच्या माध्यमातून अशा महिलांच्या आरोग्याची तपासणी काही ठराविक अंतराने वेळोवेळी करणे गरजेचे आहे.
10. विधवा महिलांच्या मूलभूत हक्कांचे संरक्षण करण्याच्या दृष्टीने जे कायदे आज आहेत त्यांचा परिणामकारक पणे अंमलबजावणीसाठी विधी आणि न्याय प्राधिकरणाने पुढाकार घेऊन प्रत्येक जिल्ह्यात विधवा महिलांचे मेळावे आयोजित करावे जेणेकरून त्यांना त्यांच्यासाठी अंमलात आणलेल्या कायद्यांची माहिती होईल

**समारोप**

कोविड काळात विधवा झालेल्या महिलांच्या आर्थिक सामाजिक कौटुंबिक समस्या या अधिक गंभीर असल्याचे दिसून येते.. कोविड महामारीचा काळ संपल्यानंतरही कोविड महामारीचे दुर्गामी प्रतिकूल आणि विपरीत परिणाम विधवा महिलावर झालेले दिसून येत आहेत. त्यांच्या आर्थिक सामाजिक समस्यांचे निराकरण करण्यासाठी शासकीय पातळीवरून वर्णमूद केलेल्या उपाययोजना प्रत्यक्ष अमलात आणणे आवश्यक आहे.

**संदर्भ**


1. स्मिता पानसरे (2021) - " तिच्या जगण्याचे प्रश्न" लोकमत न्यूज नेटवर्क, एप्रिल 2021.
2. बी. के. हरसुळे (2020) - "द रोल ऑफ सोशल वर्कर्स इन रिहॅबिलिटेशन ऑफ विडो वुमन, " इंडियन जनरल ऑफ सोशल स्टडीज अँड रिसर्च", खंड.11, क्र.7
3. हर्षला सूर्यवंशी (2022) - "जागतिक महामारी आणि विधवा महिलांच्या समस्या" इलेक्ट्रॉनिक इंटरनॅशनल इंटर डिसिप्लिनरीज जर्नल, खंड. 5, क्र.3
4. प्रियंका तुपे (2021) - "मंदिरातील प्रसादावर त्या दिवस ढकलत आहेत" वायर- मराठी, 8 जुलै 2021
5. वैशाली सुपेकर (2021) -"कोविड-19 चा महिलावरील झालेला परिणाम" जेनेसेस, खंड.10, क्र.1

6. शुभम पवार (2025) - " विधवा महिलांसाठी योजना - महाराष्ट्र" मराठी कॉर्नर, अंक-2, ऑगस्ट 2025.
7. लोकसत्ता ऑनलाईन (2022) - " कोरोनामुळे विधवा झालेल्या महिला अजूनही शासकीय योजना पासून वंचित" 12 जानेवारी 2022.
8. गायत्री अघोर (2023) - " विधवा व घटस्फोटीत महिलांच्या समस्या" मार्मिक, 16 फेब्रुवारी 2023
9. डॉ. जयंती नायक (2022) - " विधवा आणि प्रथा- परंपरा" नवप्रभा, 4 जून 2022.